२५०·९

॥ वंदेमातरम् ॥

शाहिरी............डफ

पोवाडा २६ वा

राष्ट्रपिता

# महात्मा गांधी यांचा पोवाडा

ले.—कविभूषण, महाराष्ट्र शाहीर

**प्रल्हादराय जामखेडकर, जळगांव पू. खा.**

प्रथम प्रकाशन ) मुल्य ६ आणे ( शके १८७०

पूज्य बापूजींचें हें काव्य श्रीमंत नथमल सागरमल लुंकड, जळगांव यांना सप्रेम समर्पण.



कविभूषण, महाराष्ट्र शाहीर

**प्रल्हादराय जामखेडकर**


प्रथम प्रकाशन
१ सप्टेंबर १९४८

मुद्रक
**नीलकंठराव एस. पाटील**
जनसेवक प्रिंटिंग प्रेस
जळगांव, पू. खा.

सर्वाधिकार
**सौ. विभावरीबाई जामखेडकर**
यांचेकडे आहेत.

प्रकाशक
**पी. आर. जामखेडकर**
जळगांव, पू. खा.

---



महात्मा गांधीचे स्मृतीस

## चार ओळी

ज्याचे आयुष्य सत्य, अहिंसा, त्याग आणि सेवा यांत संपूर्ण खर्ची पडून निरनिराळ्या घटनांनी खच्चून भरलेले आहे त्या अद्वितीय व परमपूज्य राष्ट्र पुरुषाचे बाबतीत सूर्यापुढें काजव्यानीं प्रकाश पाडण्यासारखीच माझी स्थिती आहे. या पेक्षा मी तरी जास्त काय सांगू शकणार !

कारणः—

तुझ्या गुणावर किति वाजवूं
किर्तीचे चौघडे.
तुझे पवाडे गाऊन आम्हीं
देऊं शांतिचे धडे. **शाहीर**

२९२०६

जयहिंद माला

शाहिरी ............... डफ

## पोवाडा २६ वा

लेखक कविभूषण महाराष्ट्र शाहीर— **प्रल्हादराय जामखेडकर**

# महात्मा गांधी यांचा पोवाडा.

अवतरे सत्य कलियुगी । नेसुनी लुंगी । वाजवी पुंगी । भुलवितो मोहन सान थोरास । योगी अवतरे राजकारणांत । म्हणून महात्माजी म्हणूं आम्ही त्यास ॥ धृ० ॥

## चौक १ ला

आठराशे एकूण सत्तरीं । पोरबंदरीं । जन्मली स्वारी । ऐकाव भविष्य तुम्ही करमचंद । देशभक्तीचा घेऊनी छंद । उद्धरील कूळ तुमचा हा नंद ॥ विचार चाले आंतले आंत । राजकोटांत । दुय्यम शाळेंत । मांस असावे नित्य जेवणांत । मांस खातांना दुःख हृदयांत । सोडून दिले मांस स्पर्शना त्यांस ॥ मॅट्रीक होतांच पास । लागला ध्यास । उच्च ध्येयास । शिक्षण घेईन परदेशांत । दीन जनतेस ज्ञान देण्यास । बॅरिस्टरी करीन भरत खंडांत ॥ आठराशे आठ्यांशी सालाला । सोडून चालला मातृभूमिला । मातोश्री घेई त्याचें वचनास । परस्त्री सोडा मद्य आणि मांस । ह्या तीन गोष्टी वर्ज तुम्हांस ॥

**चालः—**

गांधी गेले लंडन शहरांत । वस्ती ती भोजन गृहांत ॥
त्याचा होता हिंदी पोशाख । पहातांच मूर्ख हासतांत ॥

इंग्रज़ी अशी पद्धत । पाहुण्याची टर करतांत ॥
सुधारणा प्रिय म्हणतात । हाडीं मांसीं परकीय द्वेश ॥

**चाल—**

विचारी आपले मित्राला । रित भात ठावना मला । कसं राहावं पर देशाला । ते तरी सांग आम्हाला । मित्र म्हणे ऐक गोष्टीला । कोट पाटलून चढवि अंगाला । हॅट घाल आपले डोक्याला । वा बोडका फीर रस्त्याला । सुतक्यावानी पगडी तूं घालूं नको डोईला । टॉय बांध आपले गळ्याला । शिकावे नाच गाण्याला । नित्य जावे टाया टायाला । वाटेल त्याच्या घेऊन बायकोला । नाचावे तिच्या संगतिला । चुंबनाची फेर जोडिला । मद्य मांस सेवावं तुम्ही त्याच जागेला । इचार पडला तवां गांधिला । कशी येईल सभ्यता मला । साधा भोळा जीव हा फॅशन करी वेळेला ॥ नाचही येईना पायाला । व्हायोलीन शिकूं लागला । पण जुळेना मुळी ते त्याला । बायबल वाचूं लागला । तरी शांती नाहीं जिवाला । भग्वत्–गिता वाचूं लागला । झटक्यात शांती लाभली त्याचे चित्ताला ॥ ( मिळवणी ) तीन वर्षे साहुनी त्रास । केला अभ्यास । मिळवूनी यश । मोहनदास निघाला देशीं येण्यास । प्रल्हादराय म्हणे वंद्य जगतांत । म्हणून महात्माजी म्हणूं आम्ही त्यास ॥ १ ॥

## चौक २ रा

जरी झाला विलायतेस पास । हिंदी कायदाचा नाहीं अभ्यास ॥ म्हणूनिया गेला मुंबईस । कोर्टांत उभे थरकाप ॥

११२

( मिळघणी ) सहा महिने काळ लोटला। याही गोष्टीला। शद्ब उमटेना। म्हणूनि या चकीत न्याय कोटांत। परत चालला राजकोटांत। अर्ज लिहिण्याचें काम हातात ॥ दैवानें दिला मग हात। त्र्याणव सालांत। एप्रिल महिन्यांत। निघाला आफ्रिकेंत जाण्यास। उचितना घरीं स्वस्त बसण्यास। जिवन मरणाची लढाई खास ॥ आफ्रिका खंड प्रचंड। देश उदंड। पाडुनी खांड। गोऱ्यांनी वस्ती केली अटोकाट। स्वार्थावर भीस्त शेती लई दाट। काळ्यांचे कष्ट गोऱ्यांचा थाट ॥

**चालः—**

उडदांत काळे गोरे। निवडावे काय निवडणारे ॥
हीं प्रसिद्ध साधु वाणी। आफ्रिकेंत येईना कामीं ॥

**चालः—**

ऐकाव पुढं गोष्टीला। आफ्रिकेंतील इतिहास सांगतो आतां तुम्हाला ॥

**चालः—**

गोऱ्यांनीं शेती करण्याचा चंग बांधिला ॥ मजुरांची वाण म्हणून नेल हिंदी लोकाला ॥ पांच वर्षे करार केला होता गुलामगिरीला ॥

**चालः—**

कष्ट केले हिंदी लोकांनीं। घरे बांधली गोऱ्या साहेबांनीं। काम केले लाज सोडूनी। गरज सरता वैद्य हा मरो म्हण ध्या ध्यानीं ॥

**चालः—**

इतक्यांत गांधीजी आला। बॅरिस्टर कुली हा ठरला ॥

चालः—

डर्बान बंदरी आला ! रस्त्यानें चालत जाताना । हॉटेलांत जेवण जेवताना । सलूनमध्यें केस कापतांना । कोर्टांत सनद घेताना । रेलवेनें प्रवास करताना । विटाळ होतो गोऱ्या साहेबाला । फर्स्ट-क्लास तिकीट असताना । धक्के मारून नेऊन बसविले तिसरे वर्गाला ।।

चालः—

नाताळांतील दुःख हरण्यास । स्थापिली हिंदी कॉंग्रेस ।।
योजिले उपाय आनेक । सत्याची धरुनिया कास ।।
काळया गोऱ्या वर्ण भेदात । झुंजता कष्ट आनेक ।।
मृत्युची छाया घनदाट । परी वीर घालिना भीक ।।

( मिळवणी )

गोऱ्यांनीं मनसुभा केला । उपाय योजिला । हिंदी लोकाला । द्यावे हुसकून आतां येथून । " नाहींतर " जबरदस्त कर द्यावा तुम्ही आणून । कठीण हा काळ आला धावून ।। तनमन धनाची होळी । राख रांगोळी । झाली नाताळीं । गुलाम गिरी नाही म्हणती जगतात । कुली हे नांव देऊनी त्यास । नरकी पचवितो हिंदी लोकांस ।। शह देण्यास झाला तैयार । गांधी नरवीर ।। निघे सत्वर । मातृ भूमिला प्रथम येण्यास । हिंदी लोकांची दैना वदण्यास । व्याख्याने देई ठायाठायास ।।

चालः—

पांडवाचा कृष्ण सहकारी । दिनांचा गांधी कैवारी ।।
परतून चाल्ला वीरवर । संगतीला होता परीवार ।।
डर्बानचे येता बंदर । गोऱ्यांशीं लढा अनिवार ।।

**चालः—**

गांधिला करूं आम्ही ठार। चोहिकडे अेकच सूर ॥

**चालः....**

लॅटन बोले गांधिला। दिवसांच जावे घराला। कुटुंबास रवाना करावे पहिल्या झटक्याला ॥ मोहनदास लागता मार्गाला। गोऱ्यानीं वेढा तवा दिला। वेढ्यात गांधी अडकला। दगडाचा मारा मग केला। लाथ बुक्या नाही गनतिला। लहानथोर मारतो थपाडिला। सुपरिटेंन्टची पन्नि धावली त्याचे मदातिला ॥ गांधी गेले आपले घराला। गोरे धावले त्याच बाजूला। गांधी द्यावा आमचे ताब्यात। लक्षांत ठेवा गोष्टीला। डोळ्या देखत जाळून टाकू आम्ही तुमचे घराला ॥

( मिळवणी ) पोलिस साहेब धावला मदतिला। वेष बदलला। गांधी चालला। चोरावर मोर निघाला खास। कृष्ण परत्मा साह्य तो त्यास। मोहन वाचविला बीन बोभाट ॥ तीन पौंड प्रत्येकी कर। डोईजड फार। होता खरोखर। सत्याग्रह केला त्यान जोरदार। कर आजीबात नाही देणार। जाऊं तुरूंगात तेच घरदार ॥

**चालः—**

गांधीला कैद तो केला। कित्येक लोक जोडीला ॥
तुरुंगात ठेवल सर्वाला। मृत्यूची माळ कैकाना ॥

**चालः—**

शौचकूप साफ करण्याचे गांधीला ॥ वीस वर्षे काळ लोटला सामना देतांना ॥

चाल:—

यातना आबाल वृद्धांना । स्त्रीया मुलें गेली तुरुंगाला । कस्तूरबाही त्यांचे जोडिला । सत्याग्रह सर्व भागाला । संपही त्यांत भरतीला । खिळखीळी केली भांडवलशाही जय गांधीला ॥

( मिळवणी ) एकोणाविसशे चौतिस साळाला । गांधी चालला । मायभूमिला । काळ्या गोऱ्यांचा लढा मिटवून । प्रल्हाद-राय म्हणे यश घेऊन । हिंदुस्थानात आला परतून ॥२॥

## चौक ३ रा

मोहनदास सत्याग्रही वीर । धीर गंभीर । पराक्रमी थोर । कीर्ति पसरली सर्व लोकांत । चंपारण्याचा लढा लढण्यास । धावा गांधीजी राखावी लाज ॥ मळेवाले करिती हाल हाल । गोरीही वाळ । लावूनी नीळ । चेतवून गुलामगिरीचा जाळ । घालिती गळ्यांत वेठीची माळ । लाथा बुक्यांचा झाला सुकाळ ॥

चाल:—

प्रत्यक्ष पाहुनी वेळ । योजना करी बीन मोल ॥
चंपारण्यीं गेला धावून । सत्याची ध्वजा घेऊन ॥
सरकारी झाली मदत । अन्याय दूर करण्यांत ॥
साबरमतीस केला आश्रम । स्पर्शास्पर्श मानिना भेद ॥

चाल:—

खेडा जिल्हा गुजराथ प्रांताला । एकोणाविसशे सतरा सालाला । दुष्काळ त्यांचे वाट्याला । त्राण नाहीं सारा देण्याला । इचार पडला तवां लोकाला । माफी द्यावी म्हणे आम्हाला ।

कलेक्टरला चेव मंग आला । जप्तीचा खटाटोप झाला । कांहीं लोक गेले तुरुंगाला । तवा कळून चुकल साहेबाला । तहकुबी धावी रयतेला । झाला समेट सत्याग्रह थांबला जागचे जागेला ॥

( मिळवणी ) ब्रिटीशावरी होता विश्वास । त्याचा हमखास । सतरा सालांत । सैन्य भरतीची केली चळवळ । श्रम जाहले त्यांत अनिवार । कसोटी लागली नाहीं कसास ॥ एकोणाविसशे एकोणावीस सालाला । कायदा तो केला । आठरा मार्चला । काळा कायदा हो म्हणती जन त्यांस । निषेधाच्या सभा जाग जागेस । हरताळ नेमिला तीस तारखेस ॥

**चाल: —**

लोकांचे मत कळण्याला । हरताळ सहा तारखेला । घोटाळा कांहीं तो झाला । वेळेवरी तारा नाहीं गेल्या । पंजाबांत कहर मंग झाला । जालियनवाला बाग सभेला । नेमिला योग्य समयाला । हजारोंनीं लोक तो आला । लष्करी लोक धावला । जनरल डायर म्होरक्या तो त्याला । ओडवायर साह्य घटनेला । सुचनेवाचून गोळीबार तो केला ॥ शेकडोशें मुर्दे जागेला । कित्येक घायाळ झाला । लहान थोर नाहीं पाहिला । बायकांही त्यांत भरतिला । दारूगोळा जवा संपला । बंद केल तवां फैरीला । हाल हाल केले पाणी दिलं नाहीं पिण्याला ॥

**चाल:—**

लष्करी कायदा मंग केला । फटके मारले लहान थोरांना । कांहीं लोक ते दिले फासाला । हद्दपारीही कांहीं लोकांना । हर-

कीसन लालाजी भला । काळ्या पाण्याची शिक्षा ती त्याला । पुढ मिनिस्टरी माळ गळ्याला । ऐकावर दादा ॥ फरफटत ओढले कैक माणसांना । कैदेंत डांबल कांहीं लोकांना । वीज बंद ही केली समयाला । पाण्याचा सांठा त्यान अडविला । मार्शल लॉचा खवीस उठविला । न्यायनिती ही गेली खड्याला । ऐकावर दादा॥ ( मिळवणी ) असे पाहून सारे अनाचार । खवळला वीर । बोले सत्वर । सत्याग्रह मात्रा माझी जोरदार । हिंदी जनतेला एक आधार । करील कॉंग्रेस कार्य भरदार ॥ लाल, बाल, पाल धुरंधर । हिंदुस्थानभर । फिरून पुरेपूर । शिकविती एक मंत्र आपणास । स्वराज्य मिळवावे भरत खडास । तरीच सार्थक जन्माचें खास ॥ लोकमान्य धीर गंभीर । मुत्सद्दी वीर । युद्ध चतुर । नित्य तळमळ त्याचे जिवास । हटवीन बलाढ्य सामराज्यास । म्हणता म्हणतांना गेला स्वर्गास॥ टिळकांचे हातील सुत्र । अती पवित्र । करून एक छत्र । मोहनदास झाला राष्ट्र आधार । व्यर्थ बडबड केली त्वां ठार । गर्जती तुझाच जयजयकार ॥

**चाल—**

मन मोहल्यांत चाले विचार । हातीं येईल कसा कारभार ॥
सत्याग्रहाचे वळसे जोरदार । द्यावे आतां हिंदुस्थानभर ॥
त्याचा आहे मला अनुभव । शत्रुला पुरा रडवीन ॥

**चाल—**

नाताळांत गोऱ्यावर लावला त्यान तो तुरा ॥ सत्याग्रहांत पटाईत पहिला होता तो खरा ॥ तोच प्रयोग दावितो तुम्हास

येथे झरझरा ॥ भरवावी कॉंग्रेस तुम्ही आतां सत्वरा । स्पेशल कॉंग्रस ठराव केला तो पुरा ॥ असहकारानें ब्रिटीश गाडावा पुरा ॥ ( मिळवणी ) देशांत फिरून सैरा वैरा । व्रत आचरा । मागे नच सरा । चालवून शांती युक्त संग्राम । राज यंत्राला धक्के जोरदार । दडपशाहिचा कहर उडणार ॥ ३ ॥

## चौक ४ था

कॉंग्रसनें ठराव तो केला । देऊन चित्ताला । ऐका सदरेला । पूर्ण स्वातंत्र्य मान्य आम्हास । कायदे भंगास होऊन तैयार । सत्याग्रहीवीर आतां लढणार ॥

चाल—

सी. आर. दास तो गेला । सोडूनी अर्ध्या वाटेला ॥
सायमन साहेब आला । लोकांस आवळा देण्याला ॥
बहिष्कार शस्त्र हें त्याला । ठणठणीत जाब देण्याला ॥
लाहोरांत लाटीमार झाला । लालाजी आले कामाला ॥

चाल—

मिटाचा कायदा मोडण्याला । अेकोणीशें तीस सालाला । गांधीनें कूच तो केला । दांडी मार्च म्हणती हो त्याला । आश्रमातून निघाले पायीं पायीं जाण्याला ॥ गांवोगांव जागृती करीत पहा चालला ॥ पांच मार्चला गेला दांडिला । सहा अेप्रील रोजी मिटाचा कायदा मोडिला ॥ पण धरले नाही गांधिला । सत्याग्रह गावोगांवाला । धडाक्यानें सुरु तो झाला । धरपकड रोजचे रोजला। जंगल सत्याग्रहही सुरू त्याच वक्ताला। चिरनेला गोळीबार

झाला । धडधडा त्याच वेळेला । कांहीं लोक ठार जाहला । गोळीनें मामलेदार मेला । ईश्वर देतो न्यायाला । त्यांचेच हुकमानें त्यांचा प्राण घेतला ॥ राजनामे देती नौकरीला । पाटील सोडती वतनाला । धुमाकुळ उडाला बघा चारी मुलखाला ॥

चालः—

हातघाई आली नेटास । लाठीमार नित्य नेमास ॥ गोळीबार त्याचे जोडिस । कोण भितो असल्या गोष्टीस ॥

चालः—

प्राणावर उदार जो झाला । त्याला भिती कशाची बोला । कांहीं मुकलें आपले प्राणाला । कांहीं गेले कैदखान्याला । शिरोड्यावर हल्ला मग केला । पांचशेत्र्याशीं लोक गन्तीला । मीठ लुटलं त्याच दिवसाला । दिलं वाटून गरीब लोकाला । दुसरे दिवशी मीठही गेल त्याच रस्त्याला ॥

चालः—

हुकुमशाही पेटली हट्टाला । पकडले तीनशे लोकाला ॥ लाठीमार त्यांचे वाट्याला । स्लो काम होता बघण्याला ॥

चालः—

त्याचे शद्ब सांगतो तुम्हाला । असे प्रकार दिसतां डोळ्याला । लाज वाटते इंग्लीश मनाला । जळफळत जागचे जागेला । लेख दिले आपले पत्राला । तीन तारखेस गांधीजी मध्यरात्रीं कैदेला ॥ खुलं मैदान दडपशाहीला । घोडेस्वार तुडवी माण-

साला । प्राणाची पर्वा कोणाला । तवा कोड पडलं ब्रिटिशाला । मंग इचार केला सदरेला । तडजोड हवी देशाला । दिलं सोडून त्यांनीं गांधीला । जोडिस जव्हार नेहरूला । सौदा पटला नाहीं वेळेला । पुन्हा कोंडल त्यांनां कैदेला । गोलमेज परिषद राहिली जागचे जागेला ॥ बहिष्कार अस्त्र जनतेला । त्यांनी दिल योग्य समयाला । निरोधन ठायाठायाला । मुंबई प्रकार काय झाला । परदेशी वस्त्रे घेऊन चालले विक्रीला ॥ बाबुगेनु आडवा तो आला । प्राण गेला मोटारीखाली पर्वा ना त्याला ॥ अमर झाला हिंद देशाला । चिरस्मरण त्याच राहाण्याला । बाबुगेनु नांव तें दिलं त्याच रस्त्याला ॥

( मिळवणी ) पोलिसांची ऐकात्री लिला । शाळाकालेजाला । खेड्यापाड्याला । गोळीबार होतो नित्य नेमास । बेगुन्हा होती विचारे ठार । जखम्यांची दाद कोण घेणार ॥ **चाल:—**

गोरसनाला प्रकार काय झाला । स्वयंसेवक त्यांनीं तुडविला । मुसलमान त्यांचे जोडिला । राग येता सर्व जनतेला । पोलिस कोंडला त्यांनीं शाळेला । आग लावून पोलिस जाळण्याचा बेत ठराविला ॥ **चाल:—**

स्वयसेवक धावले मदतिला । प्राण दान दिले पोलिसाला ॥ पुन्हां सोडल त्यांनीं गांधीला । समेटाची भाषा करण्याला ॥ **चाल:—**

दुर्दैवी घाला तो आला । मोतिलाल चालला स्वर्गाला । मरतांना म्हणाला गांधीला । शेवटची इच्छा ही मला । स्वातंत्र्य हवे देशाला ! बंदीवान देशामध्यें मृत्यू नको तो मला ॥ वेळ

भरतांच कांटान नेळ मोतिलालाला ॥ **चालः—**

समेट झाला एकमेकांत । गांधी आयर्विन करार म्हणतात ॥
विलायतेस गेला टाकोटाक । गोलमेज सभा करण्यास ॥
सत्याग्रहानें केली मात । स्वराज्याचा पुरविला हेत ॥
स्वराज्याचे मिळवूनी हक्क । परतला गांधी देशांत ॥
( मिळवणी ) विजयाची परवाना त्याला । त्याचे संघाला । मंत्र शिकवीला । निःशस्त्राचें राजकारणांत । प्रल्हादराय म्हणे वंद्य जगतात । म्हणून महात्माजी म्हणूं आम्ही त्यास ॥४॥

## चौक ५ वा

हरीजनासाठीं तळमळ त्याचे आंतरी ॥ जातीय वादावर उपोषण तो करी ॥ एरवड्यावर करार जाहला दलितावरी ॥ मुख पत्र काढीले हरीजन कैवारी ॥ **चालः—**

१९३३ सालाला । ३१ जुलै महिन्याला । गांधिजी ठेवलें कैदेला । आगष्टचे ४ तारखेला । दिल सोडून त्यान गांधिला । टाकोटाक पकडूनी त्याला । वर्षाची शिक्षा ती दिली महात्मा गांधिला ॥ **चालः—**

१९३४ सालांत । गांधिजी गेले बिहारांत ॥
भूकंपानें लोक ते त्रस्त । महात्माजी धैर्य त्या देत ॥ **चालः—**

मग आला पुणे शहराला । महात्म्याचा जीव घेण्याला । बॉम्ब फेकला कुणी रस्त्याला । जखमा झाल्या सात लोकांना । आयुष्याची दोरी बळकट धक्का ना त्याला ॥ ऑक्टोबर २४ तारखेला । गांधिजी सोडती कॉंग्रेसला । वेळोवेळीं मार्ग दर्शन देती नेत्यांना ॥ **चालः—**

वर्ध्याजवळ सेवा ग्रामाची केली स्थापना ॥ २२ आक्टोंबर ३६ साल ते त्याला ॥ चळवळींचे मुख्य केंद्रही त्याच ठायाला ॥

**चालः—**

१९३९ सालाला । राजकोटचा लढा लढविला । उपवास सुरूं जाहला । व्हॉईसराय धावला मदतिला । आपसांत समजोता झाला । अन्याय दूर तो केला । मार्चचे ७ तारखेला उपवास सोडिला ॥ **चालः—**

१९४० सालांत । गांधिजी काय म्हणतात ॥

नका साह्य करु युद्धांत । काय फायदा हिंद देशांस ॥ **चालः—**

वैयक्तीक सत्याग्रह ज्याचा त्यानें करावा ॥ संमती दिली गांधिनीं भडका उडविला ॥ विनोबा नेहरू आझाद कोंडले कैदेला ॥

**चालः—**

मार्चचे आठ्ठावीस तारखेला । बेचाळीस साल. ते त्याला । क्रिप्स आला दान देण्याला । कोरा चेक त्याचे संगातिला । असा अभिप्राय गांधींचा त्याच वक्ताला ॥ आगष्टचे ८ तारखेला । चलेजावचा ठराव जाहला । आगष्टचे ९ तारखेला । ब्रिटिशांनीं कावा काय केला । पहाटेचा मुहूर्त तो त्याला । कैद करून त्यांनीं गांधिला । आगखान महालांत कोंडल त्याच दिवसाला ॥ महादेव देसाई भला । मृत झाला त्याच जागेला । फेब्रुवारी २२ तारखेला । कस्तूरबांचा अंत जाहला । समाधी त्याच ठायाला । ६ मे ४४ सालाला । बीन शर्त सोडल त्याजला । ४६ साल डिसेंबरच्या २६ तारखेला ॥ दंगल भागांत गेला फिरण्याला । ४७ पांच तारखेला । जानेवारी महिना तो त्याला । जातिनिशी गेला

नौखाली शांत करण्याला ॥ मे महिना पांच तारखेला। सत्तेचाळीस सालहि त्याला । ब्रिटीशांना देतो धमकिला । जा निघून तुमचे देशाला । सत्तेचाळीस साल गन्तिला । आगष्टचे १५ तारखेला । स्वातंत्र्य हिंद देशाला । स्वराज्याचा लढा संपला त्याच दिवसाला ॥ जानेवारी २० तारखेला । ४८ साल ते त्याला । काळ आला होता नेण्याला । बॉम्बनें हल्ला तो केला । काळ आला होता पण वेळ नव्हती वाचला ॥ सरकारनें पकडलं त्याला । त्यावेळी महात्मा बोलला । क्षमा करा तुम्ही त्याजला । जानेवारी ३० तारखेला । सायंकाळी ५ वाजतांना । प्रार्थनेस महात्माजी आला । काळ होता तेथे टपलेला। वदूनी पदकमलाला । काय म्हणला तवां गांधिला । कां वेळ लागला आजला । प्रार्थनेच्या ठाईं येण्याला । महात्माजी देती जावाला । आज उशीर थोडासा झाला । तोच पिस्तूल त्यान उडविला । एक गोळी लागता पोटाला । धाडकन पडला धरणीला । राम राम शब्द तो गांधी मुखांतून आला ॥ **चालः—**

टाकोटाक धरल लोकांनी खुनी माणसाला ॥ बीर्ला भवनांत नेला महात्माजी त्याच वेळेला ॥ तावडतोब डॉक्टर आले त्यांचे सेवेला ॥ यश आले नाहीं ते मुळी त्यांचे हाताला ॥ ५ वाजून ४० मिनिटांनी प्राण तो गेला ॥ **चालः—**

गांधिजीचें निधन ऐकून देश सारा हादरला । जो तो मनीं खिन्न जाहला ॥ तुकडे तुकडे होती मनांचे हृदयहार करपला । डोळ्यांतून अश्रुपूर चालला ॥ उदासवाणा देश दिवाणा जणूं काय भासला । गांधी एक मंत्र चालला ॥ पुत्रशोक तो जाळी

मातेला तसा जाळी जनतेला । हाय तो गांधी कसा वधीला ॥ हळहळती तें देशोदेशी देऊन मानाला । तया स्तव खेद व्यक्त केला ॥ चंद्राविण ती जशी कमालिनि ( वा ) पतीविण आबला । तशी गत झाली आज भूतला ॥ हिंद मातेच्या कंठातील हा दिव्य मणी हरपला । शांति दूत अजरामर जाहला ॥

चाल—

त्वेशाची तिरमीरी आली । बामना कुणीना वाली ।
जाळपोळ लुटाल्दूट केली । खूनाची सीमा जाहली ।
द्वेषाची पेटतां होळी । कांहीं मनें तृप्त जाहली ।
प्रार्थना प्रभु पद कमली । जात पात तोड या काली ।

( मिळवणी ) मोहन ब्रिज तो लाला । गेला धामाला । भरत-खन्डाला । तसा हा मोहन गेला स्वर्गांत । सत्य अहिंसेचा नेता जगतांत । प्रल्हादरायाचे वंदन महात्म्यास ॥ ५ ॥

जयहिंद

---

# महात्मागांधींच्या आयुष्यातील महत्वाच्या दिनदर्शिका

**जन्म. पोरबन्दर २-१०-१८६९ मृत्यू, दिल्ली ३०-१-४८**

**महात्माजींचा तुरुंगवास, दक्षिण आफ्रिका**

( १ ) १०- १-१९०८ जोहॉन्सबर्ग २ महिन्याची साधी

( २ ) १५-१०-१९०८ प्रिटोरिया व होल्कस्रष्ट २ म. साधी

( ३ ) १९१३ पामफोर्ड जामिनावर सुटका

( ४ ) ८-११-१९१३ स्टॅंडर्टन जामिनावर सुटका

( ५ ) ९-१२-१९१३ डंडी ९ मं. सक्त म. ८ डिसेंबरला सुटका

—: हिंदुस्थान :—

( ६ ) १०- ४-१९१९ कोसीला येथें अटक करून मुंबईस आणून सोडले.

( ७ ) १८- ३-१९२२ देश द्रोहासाठीं सहा वर्षाची शिक्षा ७।२।१९२४ ला सुटका

( ८ ) ५- ५-१९३० विना चौकशी अटक ३१ मध्ये सुटका

( ९ ) ४-१-१९३२ विना चौकशी अटक ८–५–३३ मध्ये सुटका

( १० ) ३१-७-१९३३ विना चौकशी अटक ४-८-३३ मध्ये सशर्त सुटका

( ११ ) ४-८-१९३३ एक वर्षाची शिक्षा २३–८–३३ ला सुटका

( १२ ) ९-८-१९४२ वीना चौकशी अटक आगाखान महालांत ठेवलें ६-५-४४ मध्ये सुटका

## महात्माजींचे उपवास

( १ ) १९१३ फिनीक्समध्यें १ आठवडा नैतिक अध:पाताकरितां

( २ ) १९१४ फिनिक्समध्यें पुन्हां त्याच कारणाकरितां १४ दिवसांचा

( ३ ) १२- ३-१९१८ अमदाबादमध्यें संपाबाबत ३ दि.

( ४ ) १३- ४-१९१९ साबरमतीचे रेल्वे रूळ काढल्याबद्दल ३ दि.

( ५ ) ९-११-१९२१ जातीय दंगली करितां मुंबईस ५ दिवसाचा

( ६ ) फेब्रुवारी १९२२ बारडोली चौरीचुरा प्रकर्णी ५ दि.

( ७ ) १८- ९-२४ दिल्लीकडील जातिय दंगलीसाठीं २१ दि.

( ८ ) २४-११- २५ साबरमती आश्रमातील लोकांचें अपराधा-करितां ७ दिवसाचा

( ९ ) ३- ३- ३० राजकोटात ५ दिवस

( १० ) २०- ९- ३२ कम्युनल अवॉर्ड विरुद्ध ६ दिवसांचा

( ११ ) २२-१२-३२ अप्पासाहेब पटवर्धनाकरितां

( १२ ) ८- ५- ३३ येरवड्यास आत्मशुद्धी करितां २१ दि.

( १३ ) १५-८-३३ सरकारचे निशेधाकरितां

( १४ ) जुलै १९३४ हरीजन चळवळीसाठी ७ दि.

( १५ ) १०- २- ४३ आगाखान महालांत ३ दि.

( १६ ) १- ९-४७ कलकत्यातील जातीय दंगलीकरितां ४ दि.

( १७ ) १३- १-४८ दिल्ली जातीय ऐक्यासाठीं ५ दि.

---